प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

**दि. 05.07.2018**

## सिडकोची खांदा कॉलनी, खांदेश्वर येथे अनधिकृत बांधकामाविरोधी कारवाई

मा. उच्च न्यायालयाच्या सन 2012 च्या याचिका क्र. 138 वरील आदेशानुसार सिडको किंवा महाराष्ट्र शासनाकडून कोणताही विकास परवाना न घेता करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आणि त्याबाबतचा अहवाल न्यायालयाला सादर करण्याचे निर्देश न्यायालयातर्फे देण्यात आले आहेत. त्यानुसार श्री. शिवराज पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवड श्रेणी- अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग), सिडको आणि अनधिकृत बांधकाम नियंत्रक (दक्षिण), सिडको यांच्या पथकाने दि. **04 जुलै 2018** रोजी सेक्टर- 8, खांदा कॉलनी, नवी मुंबई येथे अनधिकृत बांधकामविरोधी कारवाईचे आयोजन केले होते. सदर कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे :

भूखंड क्र. 11, सेक्टर- 8, खांदा कॉलनी येथे अनधिकृतरित्या उभारण्यात आलेले स्टॉल, मच्छी मार्केट, टपऱ्या आणि पक्ष कार्यालय इ. (अंदाजे 40 बांधकामे) निष्कासित करण्यात येऊन अंदाजे 02 एकर इतके क्षेत्र मुक्त करण्यात आले.

वर उल्लेख केलेली अतिक्रमणे-अनधिकृत बांधकामे इ. सिडकोच्या मालकीच्या भूखंडांवर कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क आणि विकासाची परवानगी नसताना उभारण्यात आली होती व सिडको प्रशासनाने योग्य ती कायदेशीर प्रकिया अवलंबून ही अतिक्रमणे निष्कासित केली.

खांदेश्वर पोलीस स्थानकातील 30 पोलीस कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने सदर कारवाई पार पाडण्यात आली. या कारवाईवेळी सिडकोचे पोलीस पथक, एमएसएफ कर्मचारी आणि सुरक्षा रक्षक हेही उपस्थित होते.

सदर कारवाई पार पाडतेवेळी 1 जेसीबी, 1 ट्रक, 6 जीप आणि 15 कामगार यांची नियुक्ती करण्यात आली होती.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको**